





दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २४४ •बुधवार,दि.०३ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रुपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







## लोकशाहीचा हक्क बजावतांना...



परळी - राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या अधिकृत उमेदवार सौ.संध्या दीपक देशमुख व त्यांचे पती दिपक रंगनाथ देशमुख यांनी शहरातील कृष्णाबाई देशमुख विद्यालयातील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा अधिकार बजावला.



बीड नगर पालिका २०२५ सार्वत्रिक निवडणुकीत आज शिवसंग्राम अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी मतदानाचा हक्क बजावला. लोकशाहीचा उत्सव, मतदानाचा संकल्प! आपलं एक मत लोकशाहीची ताकद वाढवतो. चला, जबाबदारीने मतदान करूया आणि आपल्या नगराचा विकास घडवूया!



भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योतीताई रविंद्र घुंबरे यांनी कुटुंबासमवेत मतदानाचा हक्क बजावला.



बीड : शहरातील चंपावती विद्यालयातील मतदान केंद्रावर भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, प्रभाग क्र.१५ च्या उमेदवार डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मतदानाचा हक्क बजावला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.



बीड शहरातील प्रभाग क्रमांक १७, मिलिया गर्ल्स कॉलेज मत केंद्रावर युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांनी अधिकार पार पाडला.



ॲड. गोविंद शिराळे यांनी आपल्या मतदानाचे कर्तव्य पार पाडले.



मतदानाचा हक्क बजावतांना पाटील कुटुंबीय.

# गेवराईत पंडित पवार गट आमणे सामने

# नगर पालिका मतदान केंद्रावर राडा

## बीड मध्ये ही बऱ्याच मतदान केंद्रावर तनाव

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या मतदानादिवशी बीड जिल्ह्यात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. गेवराईनंतर आता बीड शहरातील शाहूनगर भागात दगडफेकीची गंभीर घटना घडली. मतदान सुरू असताना दोन गट आमने-सामने आल्याने परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या



कार्यकर्त्यांमध्ये कुठल्या कारणावरून वाद उद्भवला हे अद्याप स्पष्ट नाही. मात्र, हा वाद क्षणात वाढत गेला आणि दगडफेक, ढकलाढकलीपर्यंत पोहोचला. दरम्यान, घटनास्थळी तात्काळ पोलीस दल पोहोचले असून जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. काही वेळानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. या दरम्यान आमदार संदीप क्षीरसागर यांनी स्वतः मतदान केंद्राला भेट देत दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांनी शांतता कायम ठेवण्याचं आवाहन करत, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडण्याची विनंती केली. निवडणूक लोकशाहीचा उत्सव आहे. कोणताही गोंधळ टाळा आणि पोलिसांना सहकार्य करा, असे क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याचं सांगितलं. राडा करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार असून तडीपाराचीही शक्यता वर्तवण्यात येत आहे. घटना घडवणाऱ्यांवर पोलिसांकडून स्वतःहून गुन्हे दाखल केले ▶ उर्वरित पान २ वर

### • गेवराईमध्ये माजी आमदाराच्या घराबाहेर दगडफेक

**दरम्यान, जिल्ह्यातील गेवराईमध्येही सकाळपासून तणावपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. पवार गट आणि पंडित गटातील संघर्षाने हिंसक वळण घेतले. माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या घरासमोरच दगडफेक झाली. संतप्त जमावाने रस्त्यावर उभ्या वाहनांची तोडफोड करत काचा फोडल्या. तणाव वाढू नये म्हणून पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात केला. वरिष्ठ अधिकारी स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.**

# आजची मतमोजणी रद्द, हायकोर्टाचा मोठा निर्णय

## नागपूर खंडपीठाचे २१ डिसेंबरला निकाल जाहीर करण्याचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. काही नगरपरिषदांबाबत न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील जवळपास २० नगरपरिषदांची मतदान प्रक्रिया पुढे ढकलली होती. ही निवडणूक २० डिसेंबरला होणार होती. त्यामुळे सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याबाबतचा सगळा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. आज मतदान झालं तरी त्याचे निकाल २१ तारखेला जाहीर करा. तसेच या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० तारखेला निवडणूक संपल्यानंतर अर्धा तासाने जाहीर करता येतील. तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असे न्यायालयाने



सांगितले. ज्या ठिकाणी निवडणूक रद्द झाली त्या ठिकाणी असलेल्या उमेदवारांना आत्ताच्या प्रक्रियेत जे निवडणूक चिन्ह मिळाले होते त्यांचे ते निवडणूक चिन्ह कायम राहणार आहे. मात्र, निवडणूक रद्द झालेल्या ठिकाणी उमेदवारांनी जे खर्च केले आहे त्यांची खर्चाची मर्यादा वाढवून देण्यात यावी ही मागणी ▶ उर्वरित पान २ वर

# सहा नगरपरिषदांसाठी गेवराईचा अपवाद वगळता बीड जिल्ह्यात मतदान शांततेत

## ४ लाख १३ हजार ८४६ मतदार निवडणार ६ नगराध्यक्ष १७२ नगरसेवक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सहा नगरपरिषदांसाठी बीड जिल्ह्यात मतदान प्रक्रिया गेवराई येथील अपवाद वगळता दुपारपयरत सर्वत्र शांततेत मतदान पार पडले आहे. यासाठी शहरी भागातील ४ लाख १३ हजार ८४६ मतदार ६ नगराध्यक्ष आणि १७२ नगरसेवक निवडून देणार. विजय माझाच म्हणणाऱ्या उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार असून, मतदारांनी मात्र कोणाला निवडले याचा फैसला मतमोजणीतून २१ डिसेंबरला होणार आहे.

राज्यात तब्बल ९ वषारच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होत असून, बीड जिल्ह्यात

### • अशी आहे मतदानाची टक्केवारी

बीड नगरपरिषद 01.30 पर्यंत 34.59 %
गेवराई नगरपरिषद 12.00 पर्यंत 09.62 %
माजलगाव नगरपरिषद 12.00 पर्यंत 10.58 %
धारुर नगरपरिषद 12.00 पर्यंत 08.49 %
अंबाजोगाई नगरपरिषद 01.30 पर्यंत 37.55 %
परळी नगरपरिषद 01.30 पर्यंत 35.26 %

बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, अंबाजोगाई, परळी या सहा नगरपरिषदेच्या निवडणुका होत आहेत. यासाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत असून, सकाळी ७:३० वाजता मतदानाला सुरुवात झाली असून ▶ उर्वरित पान २ वर

# टाकीवर चढून शेतकऱ्यांचे आंदोलन

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

अडीच महिन्यापूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या समस्या अद्यापही सोडवल्या गेल्या नाहीत. प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात न आल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढली असून या प्रश्नांवर तोडगा निघण्यासाठी सोमवारी सामाजिक कार्यकत्यारनी थेट ५० फूट उंच पाण्याच्या टाकीवर चढून अनोखे आंदोलन सुरू केले आहे. मागण्या पूर्ण होईपयरत टाकीवरून खाली उतरणार नाही, असा पवित्रा कार्यकत्यारनी घेतला आहे. आष्टी तालुक्यातील निमगाव चोभा (म्हणजे चोभानिमगाव) परिसरात १५ सप्टेंबर रोजी आलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने पीक, रस्ते, वीजपुरवठा आणि सिंचन सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अडीच महिने उलटून गेले असतानाही शेतकऱ्यांच्या तक्रारी तसेच विकासकामांबाबतची स्थिती जसंच्या तशी आहे. यामुळे सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गिरे यांनी सोमवारी गावातील पाण्याच्या उंच टाकीवर चढून उपोषणाला सुरुवात केली. नदीकडील निमगाव चोभा गावात येणारा मुख्य रस्ता नव्याने करावा, लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्याचा आराखडा तात्काळ तयार करावा, नदीकाठी संरक्षण भिंत उभारावी, गावातील वीज पुरवठा सुरळीत करावा आदी मागण्या कांतीलाल गिरे यांनी प्रशासनासमोर मांडून स्पष्ट इशारा दिला आहे की, मागण्या मान्य होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याशिवाय ते पाण्याच्या टाकीवरून खाली उतरणार नाहीत.

# जिल्हा परिषद शाळेत चार विद्यार्थिनींचा लैंगिक छळ; माजलगावात शिक्षकावर गुन्हा

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामीण भागातील एका जिल्हा परिषद शाळेत इयत्ता तिसरी ते चौथीच्या चार शालेय मुलींना धमक्या देऊन त्यांचा लैंगिक छळ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी विष्णू झोंबाडे नावाच्या शिक्षकाविरुद्ध ग्रामीण पोलिस ठाण्यात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी



त्यास अटक केली.माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या या शाळेत मागील पंधरा दिवसांपासून शिक्षक विष्णू झोंबाडे हा धमक्या देऊन इयत्ता ▶ उर्वरित पान २ वर

### • पालकांमध्ये संताप व मागणी

**या घटनेमुळे पालकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. आरोपी शिक्षक हा दोन महिन्यांपूर्वीच या शाळेवर बदलून आला होता. यापूर्वी कार्यरत असलेल्या शाळेवरही त्याने असाच प्रकार केल्याची माहिती समोर येत आहे. शैक्षणिक पवित्र कार्य असताना शिक्षक असे करत असतील, तर विद्यार्थ्यांचे भवितव्य काय? असा प्रश्न पालक व्यक्त करत आहेत. दरम्यान, आरोपीस कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आपण पोलिस अधीक्षकांची मंगळवारी भेट घेणार असल्याची माहिती पीडित मुलींच्या पालकांनी दिली आहे. पालकांनी आमच्या शाळेवर महिला शिक्षिका नियुक्त करावी, अशी मागणी केली आहे.**

## प्रभाग क्रमांक १५ मध्ये जवळपास एक तास ईव्हीएम मशीन बंद

**बीड । प्रतिनिधी**

प्रभाग क्र. १५ मधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातील बूथ क्रमांक ६ येथे आज मतदान सुरू असताना ईव्हीएम मशीन जवळपास एक तास बंद झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. मशीन ▶ उर्वरित पान २ वर






# प्लॉटच्या वादातून सख्ख्या भावाला संपवलं

**बीड । प्रतिनिधी**

वडिलांच्या नावे असलेला प्लॉट मला दे, असे म्हणत मोठ्या भावाने आपल्या सख्ख्या लहान भावाच्या डोक्यात काठी मारली. हा प्रकार शनिवारी रात्री १० सुमारास शहरातील इमामपूर रोडला घडला. सकाळी उठल्यावर जखमीला रक्ताच्या उलट्या झाल्या आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.



मोठ्या भावाला विचारल्यावर आपण काही केलेच नाही, असा आव त्याने आणला. या प्रकरणात रात्री उशिरापर्यंत पेठ बीड पोलिस ठाण्यात नोंद नव्हती, परंतु मोठ्या भावाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. सविस्तर माहिती अशी कि, सचिन शहाजी फरताडे (वय ३५) असे मयताचे नाव आहे. तर शशिकांत फरताडे (वय ४४) असे आरोपीचे नाव आहे. शहाजी फरताडे यांना चार मुले आहेत. ते आचारी असून बीड शहरातील इमामपूर रोडला वास्तव्यास आहेत. शशिकांत हा दुसरा, तर सचिन सर्वात लहान मुलगा होता. तो अविवाहित होता. शनिवारी रात्री १० च्या सुमारास शशिकांत हा गांजा व दारूची नशा करून घरी आला. कोणालाही काही न बोलता त्याने आई दत्ताबाई यांचा गळा धरत हातावर काठी मारली. मोठा भाऊ अशोक सोडविण्यासाठी गेल्यावर त्यांच्या डोक्यात कुऱ्हाड मारली. वडील शहाजी मदतीला धावले, तर त्यांच्याही मनगटावर काठीने मारहाण केली. एवढ्यात सचिन तेथे आला. शशिकांतने नशेत त्याच्यावरही हल्ला चढवला. एक काठी ▶ उर्वरित पान २ वर

# जागतिक दिव्यांग दिन : माणसाची सेवा हीच ईश्वरसेवा

## संवेदनशीलतेची, सन्मानाची आणि समतेची हाक

जगण्याचा अर्थ विचारला तर उत्तर एकच मिळते – माणूस म्हणून दुसऱ्या माणसासाठी उभं राहणं. माणसाची सेवा हीच ईश्वरसेवा. हीच दिव्यांग दिनाची खरी प्रार्थना आहे. तीन डिसेंबर हा दिवस दरवर्षी जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा होतो. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक नोंद नसून समाजाला जागं करणारी, मनाला हलवणारी आणि संवेदनशीलतेची नव्याने आठवण करून देणारी एक मूल्यप्रणाली आहे. दिव्यांग व्यक्तींचे हक्क, संधींची समानता, अडथळामुक्त समाजव्यवस्था आणि आत्मसन्मान – ही या दिवसाची चार पायाभूत तत्त्वे आहेत. भारतासह जगभर हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो. मात्र महाराष्ट्रात या वर्षी हा दिवस अधिक अर्थपूर्ण बनला कारण एका दिव्यांग युवकाच्या संघर्ष आणि कर्तृत्वाची कथा समाजात नवी प्रेरणा निर्माण करून गेली.

नवीन शासन निर्णयानुसार भारतात एकूण एकवीस दिव्यांगता प्रकार मान्य आहेत. शारीरिक, बौद्धिक, मानसिक, मज्जासंस्था, संवेदना, अंगविकार, मेंदूविकार अशा विविध स्वरूपातील अपंगत्वाचा यामध्ये समावेश आहे. अंधत्व, कमी दृष्टी, कर्णबधिरता, बोलण्यातील अडचणी, बौद्धिक अपंगत्व, मेंदूविकार, अधःकाळाचे विकार, पार्किन्सन्स, हेमोफिलिया, स्पाइनल कणा दुखापत, थॅलेसेमिया, ऑटिझम, डाऊन सिंड्रोम, ॲसिड आघात पीडित, सेरेब्रल पाल्सी – अशा अनेक प्रकारांतून हे एकवीस प्रकार निश्चित केले गेले आहेत. प्रत्येक प्रकार वेगळा,



संघर्ष वेगळा, गरजा वेगळ्या. म्हणूनच दिव्यांगता ही कमजोरी नसून विविध क्षमतांची ओळख आहे.

या दिव्यांगता प्रकारांपैकी सेरेब्रल पाल्सी हा अत्यंत गंभीर आणि आयुष्यभर त्रास देणारा मेंदूचा विकार आहे. शरीरातील कडकपणा, हालचालींवरील नियंत्रण कमी होणे, तोल सांभाळण्याची अडचण, हातपाय नियंत्रणातील त्रुटी – ही याची मुख्य चिन्हे. अशा परिस्थितीत साधे उभे राहणे, चालणे, बसणे – यासाठीही खूप मोठा संघर्ष करावा लागतो. या लाखो संघर्षकर्त्यांमध्ये जळगाव जिल्ह्यातील कुमार ऋषिकेश सुदाम माळी हे नाव तेजाने उजळते. आपल्या दिव्यांगत्वावर मात करत त्यांनी दाखवलेली जिद्द सामान्य तरुणासाठीही प्रेरणादायी आहे. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त बीड तालुक्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी ऋषिकेश आणि त्यांची आई शीतल माळी यांची भेट घेतली. ही भेट केवळ औपचारिक नव्हती, तर एका संघर्षमय जीवनाला दिलेली मनापासूनची आदरांजली होती.

ऋषिकेशच्या शरीरात स्पास्टीसिटी असून हालचाली मर्यादित आहेत. तरीही रसायनशास्त्र विषयात पदवी, औषध निर्माण शास्त्रातील पदविका, महाराष्ट्र राज्यस्तरीय पॅरालिम्पिक जलतरणात तृतीय क्रमांक, गायनाची आवड, वाचनाचा सखोल ओढ, रायगड किल्ला सर करणे आणि कळसूबाई शिखरावर झेंडा लावण्याचा निश्चय – या सर्व गोष्टींनी त्याच्या जिद्दीचा अर्थ अधिक ठळक केला आहे. हा प्रवास म्हणजे जिद्दीचं पुस्तक, आणि प्रत्येक पानावर हार मानण्याऐवजी उभं राहण्याची शपथ आहे.

या जिद्दीमागे त्याची आई शीतल माळी यांच्या अथक प्रयत्नांचा मोठा वाटा आहे. दिव्यांग मुलाचे संगोपन म्हणजे न संपणाऱ्या संघर्षाची यात्रा. प्रत्येक हालचालीसाठी मदत करणे, चालणे शिकवणे, पडू न देणे, मानसिक आधार देणे, उपचार, शिक्षण, समाजातील अडथळे – हे सर्व केवळ आईच करू शकते. आईच्या प्रेम, जिद्द आणि त्यागामुळेच ऋषिकेश आज आत्मविश्वासाने उभा आहे.

तहसीलदारांनी अत्यंत संवेदनशीलता दाखवत ऋषिकेशचे कौतुक केले. त्याच्या समस्या शांतपणे ऐकल्या आणि त्या योग्य पातळीवर मांडण्याचे आश्वासन दिले. ऋषिकेशला भेट देऊन प्रोत्साहन दिले. ही भेट प्रशासनातील माणुसकीची खरी ओळख ठरली. जागतिक दिव्यांग दिनाचा मुख्य संदेश म्हणजे – समान संधी, अडथळामुक्त व्यवस्था, शिक्षणातील समावेशकता, रोजगार, स्वावलंबन आणि समाजाचा सकारात्मक स्वीकार. आजही अनेक दिव्यांग मुलांना अपमान, अडथळे, दुजाभाव, प्रवासातील अडचणी, नोकरीतील अडथळे, शिक्षणातील असमानता – यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने संवेदनशीलतेने विचार करणे अत्यावश्यक आहे.

समाजाने दिव्यांगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा. दया नको – सन्मान हवा. सहानुभूती नको – संधी हवी. दुरावा नको – सहभाग हवा. भीती नको – समज हवी. दिव्यांग म्हणजे अक्षम नव्हेत. ते वेगळ्या क्षमतांचे धनी असून अनेक क्षेत्रांत उजळून निघण्याची क्षमता त्यांच्यात आहे. ऋषिकेश सुदाम माळी आणि त्यांची आई शीतल माळी यांच्या कथेतून एकच धडा मिळतो – दिव्यांगत्व शरीराचे असते, मनाचे नाही. धैर्य, जिद्द, प्रतिभा आणि स्वप्ने कोणत्याही अपंगत्वापुढे हार मानत नाहीत. या दिवसाचा संदेश स्पष्ट आहे – माणूसपण मोठे. त्याची मदत करणे म्हणजेच देवाची सेवा.

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

# आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

समाज ही केवळ लोकांची रचना नसून, तिच्या प्रत्येक घटकाच्या सहभागावर आधारित एक सजीव प्रणाली आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानाचा स्तर, संधी, अधिकार आणि सामाजिक प्रतिष्ठा त्याच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबूनअसते. या दृष्टीने पाहिल्यास, अपंग व्यक्तींचा अनुभव केवळ वैयक्तिक अडचणींचा विषय नसून तो संपूर्ण समाजाच्या मानसिकता, मूल्य प्रणाली, धोरणे आणि व्यवहार यांचे प्रतिबिंब आहे. दरवर्षी ३ डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन' हा दिवस केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरताच नाही, तर तो समाजातील समावेशी धोरणांचा विचार करण्याचा, अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणी ओळखण्याचा, त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, अपंग व्यक्ती ही एक सामाजिक गट म्हणून दिसते, ज्यांच्यावर शारीरिक, मानसिक किंवा अन्य अडचणींमुळे अनेक स्तरांवर भेदभाव होतो, आणि त्यांच्या सामाजिक सहभागाला मर्यादा येतात. शिक्षणाच्या क्षेत्रात, अपंग व्यक्तींना अनेकदा विशेष शैक्षणिक साधने, समायोजने आणि सहाय्य उपलब्ध नसते, ज्यामुळे त्यांचे बौद्धिक, कौशल्यात्मक आणि सामाजिक विकासावर थेट परिणाम होतो. याचा प्रभाव भविष्यातील रोजगाराच्या संधींवर, आर्थिक स्वावलंबनावर, आत्मसन्मानावर आणि समाजातील प्रतिष्ठेवर पडतो. रोजगार क्षेत्रातही अपंग व्यक्तींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, जसे की कार्यक्षेत्रात आवश्यक सुविधा न मिळणे, अपंगतेवर आधारित पूर्वग्रह, किंवा त्यांच्या क्षमतांबाबत चुकीची समजुती निर्माण करणे. याचा थेट परिणाम त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर, सामाजिक सहभागावर आणि मानसिक स्वास्थ्यावर होतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे स्पष्ट होते की अपंग व्यक्तींच्या जीवनातील ह्या अडचणी केवळ वैयक्तिक नसून त्या समाजाच्या मानसिकता, मूल्ये, धोरणे आणि सामाजिक संरचना यांच्याशी संबंधित आहेत. अपंग व्यक्तींच्या जीवनात करुणा, दया, उपेक्षा किंवा अस्वीकृतीची भावनाही समाजातील अपूर्ण मानसिक प्रतिमांनाचे प्रतीक आहे. जर समाजाने अपंग व्यक्तींविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला, त्यांना योग्य संधी उपलब्ध करून दिल्या, सार्वजनिक जागांमध्ये सुलभता निर्माण केली आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमात समावेश केला, तर समाजाच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीला मोठा गती मिळेल. अपंग व्यक्तींचा सामाजिक सहभाग मर्यादित असल्यास त्यांच्या अनुभवांचा, मतांचा आणि कल्पनांचा समाजाच्या निर्णय प्रक्रियेत समावेश होत नाही, ज्यामुळे संपूर्ण समाजाच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

सामाजिक समावेश, समान संधी, सार्वजनिक स्वीकृती आणि न्याय यासाठी धोरणात्मक उपाय करणे ही फक्त नैतिक जबाबदारी नसून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यावश्यक आवश्यकता आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार आणि संधी उपलब्ध करून दिल्यास, ते केवळ स्वतःच्या जीवनात उन्नती करतात, तर समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान देतात. अपंग व्यक्तींच्या अडचणी शारीरिक, मानसिक किंवा संवेदनशीलता यांच्या पलीकडे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरावर प्रतिबिंबित होतात. सामाजिक जीवनात त्यांच्या सहभागाची मर्यादा असल्यास, समाजाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांच्या अनुभवांचा आणि दृष्टिकोनांचा समावेश होत नाही, ज्याचा परिणाम संपूर्ण सामाजिक प्रगतीवर होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे लक्षात येते की अपंग व्यक्तींच्या अडचणींचे निराकरण ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. योग्य शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, सार्वजनिक सुविधा, सामाजिक जागरूकता आणि समावेशी धोरणे या माध्यमातूनच अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवता येते.

समाजातील समावेश, सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वांगीक विकासासाठी अपंग व्यक्तींच्या जीवनमानातील सुधारणा ही अत्यंत गरजेची बाब आहे. सामाजिक अडथळे दूर करून, समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास मानला जातो. अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करण्यासाठी सामाजिक अभियान, सार्वजनिक धोरणे, सामूहिक चर्चासत्रे, शैक्षणिक कार्यक्रम आणि माध्यमांतून जनजागृती करणे आवश्यक आहे. हे उपाय फक्त कागदोपत्री नसून प्रत्यक्ष सामाजिक बदल घडवू शकतात. समाजातील प्रत्येक घटकाचे जीवन सन्माननीय असावे, सर्वांना समान संधी मिळाव्यात आणि अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडथळे दूर करणे आणि त्यांना समान संधी देणे हे समाजाची नैतिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगती सुनिश्चित करते.

३ डिसेंबर हा दिवस फक्त स्मरणार्थ किंवा जागरूकतेसाठी नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला विचार करण्याची, आपले मानसिक प्रतिमान बदलण्याची, आणि समावेशी धोरणे अंगीकारण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा हा प्रश्न समाजाच्या सर्व घटकांशी संबंधित आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य, आणि सामाजिक स्वीकृती दिल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यामुळे आजच्या आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनानिमित्त समाजातील प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिकतेचा आढावा घ्यावा, अपंग व्यक्तींविषयी संवेदनशीलता वाढवावी, आणि त्यांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी देण्यासाठी प्रयत्न करावे. अपंग व्यक्तींच्या समस्यांचे निराकरण करणे, त्यांना समान अधिकार, संधी, आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर समाजाच्या नैतिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीसाठी अनिवार्य आहे. आजही अनेक ठिकाणी अपंग व्यक्तींवर विविध स्वरूपातील भेदभाव दिसून येतो; सामाजिक समावेश, समान संधी आणि सार्वजनिक स्वीकृतीची गरज अजूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे अपंग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहभागाला चालना देणे, त्यांच्या अधिकारांसाठी लढणे, आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलणे हे केवळ आव्हान नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांची समस्या नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, आणि त्यासाठी प्रत्येक घटकाला शासन, शाळा, कामकाजाचे ठिकाण, समुदाय आणि कुटुंब सकारात्मक भूमिका पार पाडणे आवश्यक आहे.

अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वीकृती मिळाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणेचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन फक्त स्मरणार्थ दिवस नाही, तर तो समाजाला सुधारणा घडविण्यासाठी, सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी, आणि अपंग व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रेरित करणारा एक महत्त्वपूर्ण दिन आहे. समाजातील अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करून त्यांना समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास आणि मानवतेची खरी कसोटी आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान ४ वरून पुढे...

### मतदारांमध्ये दहशत...

स्वाभाविक आहे. याबाबत अधिक माहिती घेऊन व लोकांसोबत चर्चा करुन कायदेशीर बाबीचा निर्णय घेऊ. परंतु आता शांततेत मतदान होण्यासाठी प्रयत्न करत आहोत. पुढे बोलताना ते म्हणाले की, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत साहेब यांचा फोन आला होता. त्यांनी शांततेचे आवाहन केले आहे. पोलिस प्रशासनाने परिस्थिती चांगली हाताळली आहे. आम्ही प्रशासनाला सर्व सहकार्य करत आहोत. अतिशय शांततेत मतदान चालू आहे.लोकांनी दहशतीला बळी न पडता शांततेत आपला मतदानाचा हक्क बजवावा.

### बीड नगरपरिषदेच्या...

केला. या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही भाजपने विकासाचे व्हिजन, राष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचा मुद्दा जनतेसमोर मांडत सकारात्मक प्रचार केला.

◆ पान ४ वरून पुढे...

भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड नगरपरिषदेची निवडणूक लढविण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. या संपूर्ण प्रक्रियेत माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांचे खंबीर पाठबळ लाभले. पक्षाने माझ्या पत्नी डॉ.सारिका यांना प्रभाग क्र.१५ मधून निवडणूक लढविण्याची संधी दिली. तसेच, निवडणूक काळात जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह भाजपच्या जिल्हा व शहर कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून मेहनत घेतली. तसेच, भाजपला प्रत्यक्ष –अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व संघटना, नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांचे मनापासून आभार मानतो, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

### जिल्ह्यामध्ये मनाई...

त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व

◆ पान ४ वरून पुढे...

सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा–या कर्मचा–यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा–या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी

◆ पान ४ वरून पुढे...

असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका–यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

### केज उपजिल्हा...

उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णसंख्येच्या सरासरीपेक्षा अत्यंत कमी प्रमाणात औषध पुरवठा होत असल्याने रूग्णांना अडचणी निर्माण होत आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

### गेवराईत पंडित....

जातील. सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओंच्या माध्यमातून आरोपींची ओळख पटवली जाईल. मतदान शांततेत होणं आवश्यक आहे. कोणालाही धमक्या, दहशत किंवा गोंधळ निर्माण करण्याचा अधिकार नाही, अशी स्पष्ट भूमिका कावंत यांनी मांडली. गेवराई आणि बीड शहरात पोलिसांनी अतिरिक्त फोर्स तैनात केला असून मतदान प्रक्रिया सुरक्षितरीत्या पूर्ण करण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील दोन्ही घटनांनी राजकीय वातावरण ढवळून निघालं असून उर्वरित मतदान शांततामय होण्यासाठी प्रशासन सज्ज झालं आहे.

### आजची मतमोजणी...

न्यायालयाकडून मान्य झालेली नाही. घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत, त्याचा निकाल पुढे जातोय, हे पहिल्यांदाच होतंय. हे यंत्रणांचं अपयश आहे. निवडणूक आयोगाने प्रक्रियेत सुधारणा करावी. मी पहिल्यांदाच अशी निवडणूक पाहतोय. मतमोजणी पुढे ढकलणे हे मला तरी पटत नाही. हे अतिशय चूक आहे, माझी वैयक्तिक नाराजी मी

◆ पान ९ वरून पुढे...

व्यक्त केली होती ती कायद्यावर आधारित होती. माझी नाराजी निवडणूक आयोगावर नाही तर प्रक्रियेवर आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

निकालाची तारीख पुढे गेल्यामुळे काय परिणाम होणार ?

✻ प्रशासनाला ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठी चे स्ट्रॉंग रूम आणि मतमोजणी केंद्र २१ डिसेंबरपर्यंत राखीव ठेवावे लागतील. ✻ ही निवडणूक जवळपास २८० ठिकाणांवर होत असल्याने आणि प्रत्येकाची मतमोजणी स्वतंत्र ठिकाणी वेगवेगळ्या शहरात असल्याने जवळपास २८० पेक्षा जास्त मतमोजणी केंद्र आणि स्ट्रॉंग रूम २१ डिसेंबर पर्यंत राखीव ठेवावे लागेल.. ✻ शिवाय सर्व स्ट्रॉंग रूममध्ये तेवढे दिवस ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठी चा पोलीस बंदोबस्त ठेवावा लागेल. ✻ स्ट्रॉंग रूम मध्ये ईव्हीएम असताना निवडणूक निर्णय अधिकारी तसेच निवडणूक प्रक्रियेतील कर्मचाऱ्यांना रोज स्ट्रॉंग रूम मध्ये जाऊन पाहणी करणे आणि स्वाक्षरी करणे बंधनकारक असते.. ती प्रक्रिया रोज २१ डिसेंबर पर्यंत पार पाडावी लागेल. ✻ विधानसभेला साधारणपणे २८८ ठिकाणी मतमोजणी असते, जवळपास तेवढेच मतमोजणी ठिकाण नगर परिषद निवडणुकीत आहेत.. मात्र, लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे विधानसभेची मतमोजणी वोटिंग नंतर लगेच एक

◆ पान ९ वरून पुढे...

किंवा दोन दिवसात होते. ✻ म्हणजे आज मतमोजणी समोर ढकलली गेली, तर विधानसभा निवडणूक सुमारे तीन आठवडे सांभाळावी एवढी प्रशासन आणि पोलिसांची यंत्रणा कामी लागेल.

### सहा नगरपरिषदांसाठी...

सायंकाळी ५:३० पर्यंत मतदान झाले. स्थानिक निवडणुका असल्याने आपल्या शहराचे आणि गल्लीचे कारभारी निवडायचे असल्याने मतदारांमध्ये उत्साह दिसून येत होता. मतदानाचा हक्क बजावण्यासठी मतदारांनी रांगा लावून मतदान करण्यास सुरुवात केली होती. मागील सहा दिवसांपासून सर्व उमेदवार आपलाच विजय होणार असा दावा केला जात होता. परंतु मतदार कोणाला मत देऊन कारभारी म्हणून निवडले याचा फैसला मात्र २१ डिसेंबरला मतमोजणी नंतर होणार आहे. जिल्ह्यातील सहा नगरपरिषदांच्या अंतर्गत ४५ मतदान केंद्र संवेदनशील असून यावर पोलीस प्रशासनाचे चोख बंदोबस्त ठेवला होता.

### जिल्हा परिषद...

तिसरी ते चौथीच्या वर्गातील मुलींचा लैंगिक छळ करत होता. या चार

◆ पान ९ वरून पुढे...

मुलींपैकी एका मुलीने ही माहिती आपल्या कुटुंबाला सांगितल्यानंतर हादरलेल्या कुटुंबीयांनी सोमवारी तातडीने पोलिसांकडे धाव घेतली. ग्रामीण पोलिसांनी तत्काळ शिक्षक विष्णू झोंबाडे यास अटक करून त्याच्याविरुद्ध लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला आहे.

### प्लॉटच्या वादातून...

त्याच्या डोक्यात बसली. यात तो जखमी झाला होता. रविवारी सकाळी त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. पेठबीड पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन जिल्हा रुग्णालयात आणला. शवविच्छेदन करून तो नातेवाइकांच्या ताब्यात दिला. उशिरापर्यंत ठाण्यात नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### प्रभाग क्रमांक...

अचानक बंद पडल्याने मतदारांची रांग वाढली आणि अनेकांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागली. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यानंतर मतदान प्रक्रियेत तात्पुरता खंड पडला. यामुळे काही मतदार नाराजी व्यक्त करताना दिसले. निवडणूक अधिकाऱ्यांनी तत्काळ तांत्रिक टीमला पाचारण केले आणि दुरुस्तीचे काम करण्यात आले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बोगस वोटींग, हाणामारी, लाठीचार्ज, पैसे वाटप अन् राडा! राज्यात मतदाना वेळी कुठे काय घडलं?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातल्या नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी आज मतदान झाले. २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी हे मतदान झाले. यासाठी संपूर्ण मतदान यंत्रणा सज्ज झाली होती. एकूण १२ हजार ३१६ मतदान केंद्रांवर हे मतदान झाले. पण अनेक ठिकाणी मतदाना वेळी गालबोट लागले. बोगस वोटींग, हाणामारी, लाठीचार्ज, पैसे वाटप अन् राडा असेच चित्र दिवसभर मतदाना दरम्यान पाहायला मिळाले. गेल्या काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या रखडल्या होत्या. त्यामुळे या निवडणुकीत सर्वच पक्ष ताकदीने उतरले होते. त्यामुळे सर्वच जण आक्रमक झाल्याचे चित्र पाहायला मिळेले. त्यातूनच अनेक ठिकाणी राडा झाल्याचंही दिसून आलं आहे.

### ● बीड जिल्ह्यात पैसे वाटप

बीडच्या माजलगाव मध्ये काही ठिकाणी पैसे वाटप होत असल्याचा प्रकार समोर आला. वॉर्ड क्रमांक ५ मध्ये पैसे वाटल्याचे आरोपावरून दोन गटाने सामने आले होते. त्यामुळे जोरदार राडा झाला. माजलगाव शहरात वार्ड क्रमांक पाच मध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. हा वाद विकोपाला गेला होता. पोलीसांनी या ठिकाणी वेळीच हस्तक्षेप करत दोन्ही गटाना शांत केले. तर बीड शहरातील शाहूनगर भागात दगडफेक झाल्याची घटना घडली. अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला. मतदान सुरू असताना बीड शहरातील शाहूनगर भागात ही घटना घडली.

### ● डहाणूत शिवसेना भाजप कार्यकर्ते भिडले

डहाणूत मतदान केंद्राबाहेर शिवसेना आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार राजेंद्र माच्छी आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये हा वाद झाला. भाजपचे कार्यकर्ते मतदान केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असल्याचा राजेंद्र माच्छी यांचा आरोप होता. शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजेंद्र माच्छी यावेळी आक्रमक झाले होते. त्यानंतर वॉर्ड क्रमांक ११ मध्ये तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. यावेळी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांची एकमेकांना धक्काबुक्की केली. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर वाद नियंत्रणात आला.

### ● बदलापूर नगरपरिषद निवडणुकीत ही वाद

बदलापूर पोलीस ठाण्या बाहेर दोन गटात राडा झाला. भाजप आणि शिवसेना शिंदे गटात हा तुफान राडा झाला. भाजप उमेदवार रमेश सोळसे त्यांच्या मुलाला मारहाण केल्यानंतर झाला राडा झाला. वाद मोठ्या प्रमाणात वाढत होता. त्यावेळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत लाठी चार्ज केला. त्यानंतर गर्दी पांगवण्यात आली. प्रभाग क्रमांक २२ मध्ये मतदान केंद्राच्या बाहेर उभा असताना मुलाला मारहाण करत असल्याचा जाब विचारल्याने झाला राडा झाला. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार निशा ठाकरे या ठिकाणी भाजप उमेदवार विरुद्ध उमेदवारी लढत आहे. या राड्यानंतर पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.









### ● गेवराईत लाठ्या काठ्या घेवून हल्ला

गेवराईतही अशीच स्थिती पाहायला मिळाली. लाठ्या काठ्या घेऊन दोन गटातील समर्थक आमने सामने आले होते. दोन्ही गटातून किरकोळ दगडफेक झाली. आमदार विजयसिंह पंडित आणि माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे समर्थक आमने-सामने आले होते. गेवराई तणावपूर्ण शांतता निर्माण झाली आहे. पोलीसांनी वेळीच हस्तक्षेप केला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

### ● इंदापूरमध्ये मतदान केंद्रावर गोंधळ

पुण्याच्या इंदापूर मध्ये मतदान केंद्रावर दोन्ही गटात आपापसात गोंधळ झाला होता. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले होते. पोलिसांच्या मध्यस्थीने हा वाद तात्काळ मिटवण्यात आलाय. इंदापूर शहरातील नगरपरिषदे शेजारी प्राथमिक शाळा क्रमांक दोन या ठिकाणी असणाऱ्या मतदान केंद्रावर हा गोंधळ झाला होता.

### ● जिंतूरमध्ये बोगस मतदान

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या जिंतूर मतदारसंघात आज नगरापरिषदेच्या मतदान दरम्यान जिल्हा परिषद शाळेमधे गोंधळ उडाला. काही नागरिकांनी बोगस मतदान होतं असल्याचा आरोप केला आहे. तर वयवृद्ध नागरिकांना मारहाण झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या सर्व गोंधळात पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्तिथी नियंत्रणात आणली. त्यानंतर निवडणूक प्रक्रीया सुरळीत झाली. या मतदाना दरम्यान मोठ्या प्रमाणात बोगस वोटींग झाल्याचा आरोप परस्पर विरोधी गट करत आहेत.

### ● महाडमध्ये तटकरे- गोगावले समर्थक भिडले

रायगडमध्ये भरत गोगावले समर्थक विरुद्ध जगताप समर्थकांमध्ये मोठा राडा झाल्याचे समोर आले आहे. मंत्री भरत गोगावले यांचा मुलगा विकास गोगावले विरुद्ध सुशांत जाबरे समर्थकांमध्ये मोठी हाणामारी झाल्याचं समोर आलं. गोगावले समर्थकांकडून सुशांत जाबरे याला बेदम मारहाण करण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात वाहनांची तोडफोड करण्यात आली आहे. यावेळी बंदूकही बाहेर काढल्याचं पाहायला मिळालं.

### ● सांगलीतल्या तासगावमध्ये दोन पाटील भिडले

सांगलीतही राडा झाल्याचे पाहायला मिळाले. आमदार रोहीत पाटील आणि संजय काका पाटील यांचे कार्यकर्ते एकमेकां समोर आले होते. हे कार्यकर्ते भिडले होते. यावेळी आमदार रोहित पाटील यांना धक्काबूक्की करण्याचा प्रयत्न ही करण्यात आला. तासगाव नगरपालिका निवडणूक मतदाना वेळी ही घटना घडली आहे. यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## वर्सोवा मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सहा महिन्यांच्या प्रशिक्षण सत्राचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी**

मत्स्यव्यवसायाचा विकास आणि विस्तार साधण्यासाठी वर्सोवा येथील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन तसेच सागरी डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या सहा महिन्यांच्या १३५ व्या सत्राचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण १ जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत होत असून पात्र मच्छिमारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या प्रशिक्षणात मत्स्यव्यवसाय नौकानयनाचे मूलतत्त्व, सागरी डिझेल इंजिनचे भाग, त्यांची दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने तसेच प्रात्यक्षिक सत्रांचा समावेश आहे. या प्रशिक्षण सत्राकरिता इच्छुक व पात्र मच्छिमारांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित मच्छिमार सहकारी संस्थेच्या शिफारशीसह मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग, तेरे गल्ली, वर्सोवा, मुंबई-१९ येथे २२ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत, असे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी स. श. भालेराव यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी सचिन भालेराव, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी (९९२०२०१२०७) आणि जयहिंद सूर्यवंशी, प्रशिक्षण निर्देशक (७५०७९८८५५२) यांच्याशी संपर्क साधावा.

# महापरिनिर्वाण दिनासाठी सुरक्षेसह सेवासुविधांची काटेकोर अंमलबजावणी करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

देशभरातून महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमी परिसर तसेच मुंबईत लाखोंच्या संख्येने अनुयायी येतात. येणाऱ्या अनुयायांची सुरक्षितता आणि सोयीसुविधांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. चैत्यभूमी येथे उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासंदर्भात विविध सूचना प्राप्त झाल्या असून याबाबत समन्वय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला ज्ञान दिले आणि जागरूक केले. या जागरूकतेला अधिक बळकटी देण्याचा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा प्रयत्न महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने आपण सर्वजण करुया, असेही आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. या बैठकीस सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय गिरकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, बेस्ट'च्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, तसेच विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, चैत्यभूमी परिसरात योग्य मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहदारीचे योग्य नियोजन आणि नियंत्रण करावे. अनुयायांना मार्गदर्शन मिळावे यासाठी जागोजागी सूचनाफलक लावावेत. तसेच, नागरिकांना सुलभ प्रवासासाठी बेस्टतर्फे अतिरिक्त बससेवा उपलब्ध ठेवावी.



# वाचनाने मस्तक सशक्त होते; सशक्त मस्त कोणापुढेही नतमस्तक होत नाही

## वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या ४२व्या केंद्राचा प्रारंभ व अभिवादन ग्रुप तर्फे शालेय साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

पालकांनी आजच्या मोबाईल इंटरनेटच्या मायावी जगात लहानपणीच जर चांगली पुस्तके मुलांच्या हाती दिली तर त्यांना साने गुरुजी, रवींद्रनाथ टागोर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद व आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करण्याकरिता आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर भगतसिंग, राजगुरू व सुखदेव तसेच स्वातंत्र्यांकरिता काळ्यापाण्याची शिक्षा भोगणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची जीवन चरित्र पुस्तके आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची पुस्तके जर विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली तर त्यांना वाचनाची गोडी लागेल व सुजान नागरिक बनुन स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाची प्रबळ भावना जागृत होऊन आपल्यामध्ये राष्ट्रीय भावना पक्की रुजून आपल्या सर्वांचे कल्याण होईल अशी डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित असलेली लोकशाही कल्याणकारी राज्य बहुजन हिताय, बहुजन सुखाय निर्माण होण्याकरिता हिंसेच्या मार्गाने न जाता कोणताही अडथळा येणार नाही हा आशावाद महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले यांनी वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या ४२ व्या केंद्राचे अंकुश नगर बीड येथे उद्घाटन प्रसंगी प्रतिपादन केले. वाचनाने मस्तक सशक्त होते व सशक्त मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही हा महामानवांच्या महानउपदेशाबद्दल उपस्थित विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. योगेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित मदर टेरेसा बालकाश्रम अंकुश नगर बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप यांनी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही - पेन) वाटप कार्यक्रम प्रसंगी वस्तीगृहाचे संचालक मा. बालाजी जाधव अध्यक्षपदी तर प्रा. गजानन चित्रे, जी.एम. भोले व मुख्याध्यापिका वैशाली शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते तर वाचाल तर वाचालचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले, काशिनाथ वाघमारे एएसआय अशोक ठोकळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी तर प्रास्ताविक प्रा. अशोक गायकवाड यांनी केले. सर्वप्रथम क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. मा. जी.एम. भोले यांनी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुदायिक वाचन घेतले. वाचनालयाचे उद्घाटन प्रसंगी डी.जी. वानखेडे यांनी फिरते मोफत वाचनालयाची कार्यप्रणाली समजावून सांगितली. व या संचातील सर्व पुस्तकांचे विद्यार्थ्यांनी वाचन करून आपल्या ज्ञानात भर घालावी असे नम्र आवाहन केले. व दोन महिन्यानंतर नवीन ६० पुस्तकाच्या संच वितरित केल्या जाईल. पहिल्या संचातील पुस्तकावर आधारित स्पर्धा परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना पुस्तक रूपात बक्षीस दिल्या जाईल असे स्पष्ट केले. पुस्तक वितरणाची जबाबदारी प्रा. गजानन चित्रे यांनी स्वंयस्फूर्तपणे स्वीकारली. प्रा. अशोक गायकवाड यांनी त्यांच्या प्रियदर्शी वाचनालयातर्फे चित्रकला



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने १ लाख दिव्यांगांना कृत्रिम अवयव वितरण

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी सर्व सुविधा मिळवून देण्याकरिता शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न आहेत. समाजातील सर्व घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्याचे शासनाचे ध्येय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व रतननिधी फाऊंडेशनतर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यक साधन वितरण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमाद्वारे १ लाख दिव्यांग व्यक्तींना लाभ देण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून, हा अभिनव प्रकल्प दिव्यांग पुनर्वसनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असून, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने त्यासाठी अधिक प्रभावी कार्यवाही केली जात आहे . या उपक्रमाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनवणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे हा आहे. कृत्रिम हात, पाय, श्रवणयंत्रे, व्हीलचेअर्स आणि इतर सहाय्यक उपकरणे यांचा समावेश आहे.

# दिव्यांगत्वावर मात करून राष्ट्रीय सुवर्ण गाठणारी आभा मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन. दिव्यांग व्यक्तींच्या जिद्दीचा, सामर्थ्याचा आणि कर्तृत्वाचा गौरव करण्याचा दिवस. याच निमित्ताने परळी तालुक्यातील डाबी गावातील आभा गणेश मुंडे ही युवा पॅरा स्विमर आणि योगपटू आज राज्यभर चर्चेत आली आहे. दिव्यांग असूनही कठोर परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा संगम साधत तिने राष्ट्रीय क्रीडा रंगभूमीवर सुवर्णकहाणी लिहिली आहे.

जन्म, शिक्षण आणि लहानपणातील जिद्द- ८ नोव्हेंबर २०१० रोजी जन्मलेली आभा सध्या विद्यावर्धिनी टीपीएस कॉलनी शाळेत शिकत आहे. लहानपणापासूनच खेळावरील जिद्द, आव्हानांना न घाबरण्याची वृत्ती तिच्या कुटुंबाला दिसली. सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे आभा आज राष्ट्रीय स्तरावर चमकत आहे, आणि तिच्या कामगिरीमुळे संपूर्ण तालुका अभिमानाने भारावलेला आहे.

राष्ट्रीय व आंतरराज्य पातळीवरील कामगिरी- २०२४, गोवा - राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धा : ५ सुवर्णपदके, २०२५, हैदराबाद - राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धा : ५ सुवर्णपदके, २०२५ - राष्ट्रीय योगासन स्पर्धा : १ सुवर्णपदक, २०२४, पोरबंदर - खुला समुद्र जलतरण (५ किमी) : तिसरा क्रमांक, एकूण ११ सुवर्णपदक आणि खुल्या समुद्रातील कठीण स्पर्धेत मिळालेला तिसरा क्रमांक तिच्या क्षमतेचा ठळक ठसा ठरतो.



योगाभ्यासाची पायाभरणी : काका शरद मुंडे- आभाचे काका शरद रघुनाथराव मुंडे, योग शिक्षक व सध्या उजबेकिस्तानमध्ये भारताचे कल्चर दूत, यांनी लहानपणापासून आभाला योगाचे शास्त्रीय धडे दिले. योगासनांमुळे मिळालेली मानसिक स्थिरता, श्वसन-तंत्र आणि शिस्त आभाच्या जलतरण कामगिरीत निर्णायक ठरली.

स्विमिंग प्रशिक्षक : संजय भगत यांचे मार्गदर्शन- राष्ट्रीय पातळीवर आभाचे जलतरण कौशल्य विकसित करण्यात स्विमिंग कोच संजय भगत यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्यांनी तिला तंत्रज्ञान, सराव पद्धती आणि स्पर्धात्मक रणनीती शिकवली, ज्यामुळे आभाचे प्रदर्शन जलतरण स्पर्धांमध्ये उल्लेखनीय झाले.

वडील गणेश मुंडे : अथक प्रयत्नांचा खांब- वडील गणेश रघुनाथराव मुंडे यांनी आभाच्या प्रशिक्षण, पोषण, प्रवास आणि स्पर्धेच्या तयारीत दिवस-रात्र मेहनत घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आभाचा आत्मविश्वास आणि कौशल्य दोन्ही वाढले.

वैजनाथ वेरुळे : प्रेरणादायी मानसिक आधार- वडिलांचे बालपणीचे मित्र वैजनाथ वेरुळे प्रत्येक स्पर्धेला उपस्थित राहून आभासह सर्वांना मानसिक बळ देतात. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे आभासह सर्वांना प्रत्येक स्पर्धेत आत्मविश्वास आणि जिद्द मिळाली.

मुला मुलींसाठी प्रेरणा - आभाच्या कामगिरीमुळे परळी व आसपासच्या भागातील मुला मुलींसाठी आभा मुंडे ही प्रेरणा बनली आहे. तिच्या जिद्दीला पाहून काही मुले व मुली तिच्याबरोबर नियमित सराव करत स्पर्धांसाठी तयारी करतात. ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीत हा सकारात्मक बदल अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

२०२५ मालवणमधे होणाऱ्या समुद्रस्पर्धा : १० किलोमीटर खुल्या पाण्यातील आव्हान- आभाने मालवणमधे होणाऱ्या समुद्र स्पर्धेत १० किलोमीटर मधे नोंदणी केली आहे तिच्या प्रेरणेमुळे या स्पर्धेत स्वरा चाटे ही दिव्यांग असून हिने १ किलोमीटर साठी नोंदणी केली आहे तसेच समीक्षा वेरूळे सिद्धी चाटे आर्या वेरूळ राजनंदिनी चाटे यांनी सुद्धा सहभाग घेतला आहे ही स्पर्धा १४ १५ डिसेंबरला मालवण येथे होणार आहे . ही शर्यत अत्यंत आव्हानात्मक असून, आभा पूर्वतयारी, मानसिक दृढता आणि शिस्त यासह उतरायला सज्ज आहे.

भविष्याचे ध्येय : ऑलिम्पिक सुवर्ण- आभाचे पुढील स्वप्न स्पष्ट - ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी सुवर्णपदक जिंकणे. कडक सराव, शिस्तबद्ध जीवन आणि सातत्य या मार्गाने तिने हे ध्येय साध्य करण्याचा संकल्प केला आहे. आभा मुंडेची कहाणी फक्त खेळाडूची यशोगाथा नाही, तर दिव्यांगत्वावर मात करून जीवनात कर्तृत्व सिद्ध करण्याचा प्रेरक संदेश आहे. परळी तालुक्यातील ही सुवर्णमुलगी आज राज्यातील आणि देशातील सर्व दिव्यांग आणि विद्यार्थ्यांसाठी आशेचा तेजस्वी दीप बनली आहे.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार, दि. ०३ डिसेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवार रोजी शिवाजी महाराज कोकणे यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील चौथ्या पुण्यतिथी मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.रामायणाचार्य शिवाजी महाराज कोकणे चिखली, ज्ञानाई, तुकाई गुरूकुल आष्टी यांचे गुरुवार दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी बेलवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.


### गेवराईत भीषण अपघात; ट्रॅक्टरची जोरदार धडक बसून दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू




**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील बीड रोडवरील बाह्यवळण चौकाकडे जाणाऱ्या दुचाकीस्वाराला समोरून येणाऱ्या ट्रॅक्टरने जोराची धडक दिल्याने अपघातात एक जण ठार झाला. बशीर वजीर कुरेशी शनिवारी सायंकाळी ६:३० वाजता दुचाकीवरून बीड रोडवरील बाह्यवळण चौकाकडे जात होते. ते शहरातील दसरा मैदानासमोर आले असता, भरधाव वेगातील ट्रॅक्टरने दुचाकीला जोराची धडक दिली. त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. नागरिकांनी ट्रॅक्टर चालकाला ताब्यात घेतले. घटनेनंतर दुचाकीस्वाराचा मृतदेह येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला.

### आठ महिन्यापूर्वीच लग्न झालेल्या नवविवाहितेने घेतला गळफास



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सातेफळ येथे आठ महिन्यापूर्वीच विवाह झालेल्या नवविवाहित तरुणीने शेतातील झाडाला गळफास घेऊन जीवन संपवले आहे. सातेफळ तालुका केज येथे १ डिसेंबर रोजी प्रतीक्षा उर्फ राणी दीपक (पापा) भांगे या २५ वर्षीय विवाहितेने शेतात बाभळी झाडाला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ५:०० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. आत्महत्येची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल गित्ते हे घटनास्थळी हजर झाले. त्या नंतर प्रेत उत्तरीय तपासणी व शवविच्छेदनासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय येथे शव विच्छेदन हलविले. दि. २ डिसेंबर रोजी प्रेताचे शवविच्छेदन करण्यात आले असून अद्याप या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्याची कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिस उपनिरीक्षक मांजरे यांनी दिली आहे. दरम्यान प्रतीक्षा उर्फ राणी भांगे हिचे लग्न दिपक (पापा) भांगे यांच्या सोबत माहे एप्रिल २०२५ रोजी झाले होते. तिच्या लग्नाला फक्त आठ महिनेच झाले होते. या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### विलास पत्की यांचे दु:खद निधन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील रहिवासी विलास मार्तंडराव पत्की यांचे हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन भाऊ व एक बहिण आहेत. प्रा. सतीश पत्की यांचे ते चुलत बंधू होते.

### शेत तलावात बुडून सख्ख्या बहीण-भावाचा मृत्यू

**आष्टी । प्रतिनिधी**




खेळत खेळत शेत तलावाजवळ गेलेल्या सख्ख्या बहीण-भावाचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथे शनिवारी सकाळी सव्वाआठ वाजता घडली. श्रावण रोहिदास चव्हाण (वय ८) व श्रावणी रोहिदास चव्हाण (वय १०) (मूळ रा. कुसवडगाव, ता. जामखेड, जि. नगर) अशी मयत भावंडांची नावे आहेत. जामखेड तालुक्यातील कुसवडगाव येथील मजूर रोहिदास चव्हाण (वय ३५) हे सध्या मजुरी करण्यासाठी आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथे कुटुंबासह आलेले असून, याच ठिकाणी राहात आहेत. त्यांचा मुलगा श्रावण रोहिदास चव्हाण व मुलगी श्रावणी रोहिदास चव्हाण हे दोघे बहीण-भाऊ २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ८:१५ वाजता खेळत खेळत शेतकरी शिवाजी दौंडे यांच्या शेतात गेले. यावेळी शेत तलावात पाय घसरून पडल्याने दोघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक हिंगे हे करत आहेत.

# मतदारांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक वाद निर्माण केला : अमरसिंह पंडित

## अमरसिंह पंडित यांनी कार्यकर्त्यांना केले शांतता आवाहन



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगर परिषद निवडणुकी मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजपा दोन्ही पक्षांमध्ये मारहाण झाल्याच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी कृष्णाई वर पत्रकार परिषद घेऊन शहरातील कार्यकर्ते आणि मतदारांना शांततेने मतदान करण्याचे व प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, आम्ही ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढत आहोत. मागील एक वर्षाच्या काळात मोठी विकास कामे केली आहेत. जाहीरनामा जनतेसमोर दिला असून त्यात केलेली कामे व करायची कामे जाहीर केलेली आहेत. आम्ही एक वर्षाच्या काळामध्ये केलेल्या कामामुळे विरोधकांना बोलायला काही जागाच नव्हती. म्हणून ते दडपशाही करु लागले आहेत.

सकाळच्या घटनेची माहिती देताना ते म्हणाले की, आम्ही सर्व मतदान प्रक्रियेत असताना 'कृष्णाई' वर कोणी नव्हते. अशावेळी येथे येऊन माझे स्विय सहायक अमृत डावकर यांना विनाकारण बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकरणाची प्रतिक्रिया उमटने ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाने अत्यंत तुल्यबळ लढत : डॉ. क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाने अत्यंत तुल्यबळ लढत दिली. या निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योती रविंद्र घुंबरे यांच्यासह ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांना बीडच्या जनतेने मतदानरुपी आशीर्वाद दिले. या सर्व मतदारांसह भाजपला सहकार्य करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

डॉ.क्षीरसागर यांनी पत्रकात पुढे म्हटले की, निवडणूक काळात राष्ट्रवादी काँग्रेसकडून अनेक ठिकाणी पैशांचे आमिष दाखविण्यात आल्याचे तसेच काही मतदान केंद्रांच्या बाहेर उमेदवारांच्या नातेवाईकांकडून पैसे वाटप झाल्याचे व्हिडिओ समोर आले. शरदचंद्र पवार गटासह काही कार्यकर्त्यांनी दडपशाही व राडा घालण्याचे प्रकार केल्याचे निदर्शनास आले. निवडणूक जाहीर झाल्यापासून काही जातीवादी पक्षांनी जात-धर्माचा मुद्दा पुढे करून भाजपला बदनाम करण्याचा प्रयत्न ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात नगरपालिका, महानगरपालिका, महापरिनिर्वाण दिन तसेच विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. १७ डिसेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा ▶▶ उर्वरित पान २ वर

## जामखेड - नगर महामार्गावरच टाकले मुरूम- दगड; अपघाताचा धोका



**कडा । प्रतिनिधी**

जामखेड - नगर महामार्गवरील कडा येथील बस स्थानकासमोर रविवारी रात्री टेलीफोन वायरिंग कामासाठी खड्डा खादला होता असे येथील नागरिकांनी सांगितले. रस्त्यावर टेलिफोन वायरिंग, पाण्याची पाइपलाइन इतर कशाचेही काम चालूच असते. परंतु ज्या कामासाठी खड्डा खादला ते काम झाल्यावर पुन्हा आहे तसा खड्डा बुजवून का घेत नाही ? रविवारी रात्री कडा बस स्थानकासमोर खड्डा खादला परंतु त्या खड्ड्यातील निघालेले मुरूम,दगड चक्क नविन झालेल्या सिमेंट रस्त्यावरच टाकले आता या मुरूम दगडावरून वाहने घसरून अपघात झाला तर ? याची काळजी का घेत नसतील ? या मनमानी पद्धतीने चाललेल्या कामावर संबंधित अधिकारी लक्ष देतील का ? प्रवाशांच्या जिवाशी असा वेडा खेळ खेळू नये अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## माजलगाव तेलगाव मार्गावर पडक्या घरात वयोवृद्धाचा कुजलेला मृतदेह



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील नित्रुडजवळ कुजलेल्या अवस्थेत एका वयोवृद्धाचा मृतदेह आढळल्याची घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. पालखी महामार्गावरील माजलगाव-तेलगाव राज्य महामार्गावरील नित्रुड शिवारातील एका पडक्या घरातून दुर्गंधी येत असल्याचे स्थानिकांना जाणवताच त्यांनी पाहणी केली असता, एका व्यक्तीचे कुजलेले प्रेत आढळून आले. माहिती मिळताच दिंद्रुड पोलिसांनी घटनास्थळी पोचून मृताच्या खिशातील कागदपत्रांवरून त्याची ओळख पटवली. मृताचे नाव बाबू रानबा तिडके (वय ६९, रा. रामनगर, गोविंदवाडी, ता. माजलगाव) असे असून सोमवारी सायंकाळी त्याचे नातेवाइक घटनास्थळावर दाखल झाले. पात्रुड प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल मायकर यांनी घटनास्थळीच शवविच्छेदन केले आणि नंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. तिडके यांचा मृत्यू अंदाजे सहा ते सात दिवसांपूर्वी झाल्याचा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी वर्तवला आहे. घटनास्थळी दोन विषाच्या बाटल्या आणि एक दारूची बाटली आढळल्याची माहिती दिंद्रुड पोलिस स्टेशनचे सपोनि महादेव ढाकणे यांनी दिली.

## ऊस दरासाठी तीस ग्रामपंचायती एकवटल्या, तहसीलदारांना निवेदन



**बीड । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील ३५ पैकी ३० ग्रामपंचायतींनी ऊस दर आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. सद्यस्थितीत ऊस उत्पादनाचा खर्च अत्यंत वाढलेला असताना कारखानदारांकडून कोणताही दर जाहीर करण्यात आलेला नाही. याचा तीव्र निषेध ३० ग्रामपंचायतींनी केला. मागण्यांवर समाधानकारक तोडगा निघत नाही, तोपर्यंत कोयता बंद, ऊस वाहतूक बंद आणि क्रशिंग बंद या आंदोलनास तालुक्यातील ३० ग्रामपंचायतींनी बहुमताने पाठिंबा जाहीर केला आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाला दरवाढ देण्यात यावी व भाव निश्चित करावा, अशी मागणी करण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला अनेक गावांतील ग्रामस्थांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. याबाबत ग्रामपंचायतींनी तहसीलदारांमार्फत राज्याच्या सहकार मंत्र्यांना निवेदने पाठवण्यात आली आहेत. शेतकरी नेते अजय बुरांडे, गंगाभिषण थावरे, दत्ताजी डाके, अजय राऊत, ओम पुरी, जगदीश फरताडे व युवा नेते संजय आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन सुरू आहे. ऊसतोड कामगार, शेतकरी, ऊस वाहन मालकांना बंदमध्ये सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी तात्काळ ऊस दरवाढ जाहीर न केल्यास हे आंदोलन उग्र होऊ शकते, असे शेतकरी नेते जगदीश फरताडे यांनी सांगितले.

## केज उपजिल्हा रुग्णालयात औषधांचा तुटवडा

**केज । प्रतिनिधी**

उपजिल्हा रुग्णालय केज येथे औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून त्यामुळे रुग्ण व नातेवाईकांना बाहेरून औषध विकत घ्यावे लागत असल्याने आरोग्य सेवा आणि आरोग्य विभाग यांच्या विरुद्ध जनतेतून रोष व्यक्त होत आहे. बीड जिल्ह्यातील अत्यंत नावाजलेल्या अशा केज येथील उपजिल्हा रुग्णालययात केज आणि परिसरातील ग्रामीण भागातून उपचारासाठी रुग्ण येत असतात. दररोज सुमारे ६०० ते ६५० अशी दररोजची बाह्य रुग्णांची नोंद या उपजिल्हा रुग्णालयात होत आहे. मात्र येथे येणाऱ्या रुरुग्णांना साधे खोकल्याचे सिरप देखील उपलब्ध नसते तसेच इंजेक्शन्स, औषध आणि सलाईनची सुई, सिरिंज, स्टिकिंग टेप देखील बाहेरून विकत घ्यावे लागत आहे.त्यामुळे औषध वाटप विभागातील कर्मचारी आणि रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्यात भांडण व संघर्ष होण्याच्या घटना घडत आहे. येथील औषधी विभागाच्या एका कर्मचाऱ्याने प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, केज येथील ▶▶ उर्वरित पान २ वर

# कोयता बंद, वाहतूक बंद, कारखाना बंद;

## बीडमध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांचं आंदोलन चिघळलं



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाने निर्णायक वळण घेतलं असून परिस्थिती आणखी चिघळली आहे. भाववाढीच्या मागणीसाठी गेल्या महिनाभरापासून सुरु असलेल्या आंदोलनाने आता तीव्र स्वरूप धारण केलं आहे. शेतकऱ्यांनी'कोयता बंद, वाहतूक बंद, कारखाना बंद' अशी घोषणा देत ऊस तोडणी आणि वाहतूक पूर्णपणे रोखून धरली आहे. शेतकऱ्यांची ठाम मागणी-पहिली उचल ३ हजार रुपये, तर अंतिम दर ४ हजार रुपये प्रति टन करावा. या मागणीसाठी अनेक बैठका झाल्या, आंदोलने झाली, पण तोडगा न निघाल्याने शेतकऱ्यांचा संताप उसळला आहे. त्याआधी शेतकऱ्यांनी गावागावात आंदोलन छेडले. टायर पेटवून रास्ता रोको केला आणि दोन वेळा माजलगाव येथे राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. कारखानदार आणि शेतकरी प्रतिनिधींमध्ये झालेली बैठक निष्फळ ठरल्याने संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. सध्या बीड जिल्ह्यातील तीन मोठे साखर कारखाने आणि तीन गुळ निर्मिती युनिट बंद पडली आहेत. यात आमदार प्रकाश सोळंके यांच्या सुंदरराव सोळंके कारखान्याचा, मोहन जगताप यांच्या छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा आणि जय महेश खासगी साखर कारखान्याचा समावेश आहे. तसंच, तीन मोठ्या गुळ कारखान्यांसह लहान उद्योगही ठप्प झाले आहेत. युवा शेतकरी संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी वाहतूक थांबवण्यासाठी रात्रीदेखील पहारा ठेवण्यास सुरुवात केली आहे. कडाक्याच्या थंडीतही शेतकरी रस्त्यावर ठामपणे उभे आहेत. दरम्यान, या संघर्षावर लवकर निर्णय न झाल्यास पुढील दिवसांत आंदोलकांचा स्वर आणखी आक्रमक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सरकार किंवा कारखानदारांनी तोडगा काढला नाही तर संपूर्ण जिल्ह्यात गाळप हंगाम ठप्प पडण्याची भीती निर्माण झाली आहे.